माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ/३५५८/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| अक्षय सुनील जगताप | उप अभियंता<br>झोन क्र.४ बांधकाम विकास विभाग, पुणे महानगरपालिका | कार्यकारी अभियंता<br>झोन क्र.४ बांधकाम विकास विभाग, पुणे महानगरपालिका |

**(सुनावणी दिनांक- ०२.०७.२०२६)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि.२५.०८.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ०९.०५.२०२५ | मुंढवा क्षेत्रातील सर्व नाल्यांची यादी आणि ओळख, पीएमसीच्या कार्यक्षेत्रात प्रत्येक नाल्यासाठी, हे निर्दिष्ट करा: १) स्थान (प्रभाग किंवा भूखंडानुसार) २) परिमाणे: रुंदी, खोली, लांबी ३) प्रकार: नैसर्गिक / बांधलेले? ४) हंगामी किंवा बारमाही ५) लगतच्या रस्ते, भूखंड किंवा सार्वजनिक पायाभूत सुविधांशी स्थितीत्मक संबंध (सर्वेक्षण नकाशावरील रस्त्यापासून अंतर) ६) सद्यस्थिती: उघडे/ आच्छादित /वळवलेले /अतिक्रमित? २. वळवण्याबाबत सरकारी ठराव (जीआर)/ आदेश मुंढवा परिसरातील कोणत्याही नाल्याचे वळवणे, झाकणे किंवा मार्ग बदलण्याची परवानगी देणारे किंवा कागदपत्रे देणारे कोणतेही जीआर, प्रशासकीय आदेश किंवा महानगरपालिकेच्या प्रमाणित प्रती. तसेच या विषयास अनुसरून इतर मुद्यांची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, " माहिती दिली नाही." त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, " दि. ०६.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. "

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचे दिसुन येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०७.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्यात आली आहे. पुणे मनपाच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या माहितीच्या अर्जानुसार लिंक उपलब्ध करुन द्यावी असा आदेश देऊन अपिल निकाली काढल्याचे दिसून येते.

प्रकरी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे. जन माहिती अधिकारी यांनी वस्तुनिष्ठ उत्तर दिले आहे.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ/३५५८/२०२५/पुणे 4343/2026 दिनांक - 23/1/26